**ठळक बातम्या**

- राज्यात अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या अडीच लाख शेतकऱ्यांना ३३४ कोटी रुपये नुकसान भरपाई देण्याबाबतचा शासन आदेश जारी

- राज्यात गौणखनिज आणि वाळू तस्करी रोखण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याची महसूल मंत्र्यांची घोषणा

- आधुनिकीकरणासाठी नागपूर विमानतळाचे जीएमआर कंपनीला हस्तांतरण

**आणि**

- नसरापूर बालिका अत्याचार आणि हत्येप्रकरणी आरोपी भीमराव कांबळे दोषी, शिक्षा येत्या सोमवारी सुनावणार

**<><><><><>**

राज्यात अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या अडीच लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांना ३३४ कोटी रुपयांहून अधिक रकमेची नुकसान भरपाई देण्याचा शासन आदेश राज्य सरकारनं आज जारी केला. गेल्यावर्षीच्या ऑक्टोबरपासून यंदाच्या मे महिन्यापर्यंत झालेल्या अवकाळी पावसानं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही आर्थिक मदत जमा होणार आहे. यात कोकणातल्या आंबा आणि काजू पीकाचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठीच्या २०९ कोटी रुपयांच्या नुकसानी भरपाईचाही समावेश आहे. कोकणातल्या जिल्ह्यातल्या १ लाख ३४ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना ही रक्कम मिळेल. नागपूर, वर्धा, चंद्रपूर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहिल्यानगर, ठाणे, सिंधुदुर्ग, कोल्हापूरमधल्या शेतकऱ्यांचं गेल्या २ महिन्यात अवकाळीमुळे झालेल्या नुकसानीपोटी १०६ कोटी रुपयांच्या मदतीचा यात समावेश आहे. ९५ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. याशिवाय विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यांमधल्या शेतकऱ्यांनाही या मदतीचा लाभ मिळणार आहे.

ही रक्कम येत्या ८-१० दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असं आश्वासन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज विधानसभेत दिलं होतं. याशिवाय कोकणातल्या सुमारे

७२ हजार शेतकऱ्यांना पीक विम्याचे २१७ कोटी रुपये येत्या १५ दिवसांत दिले जातील, असं आश्वासन देखील कृषिमंत्र्यांनी दिलं आहे.

<><><><><>

राज्यात गौणखनिज माफिया आणि वाळू तस्करी रोखण्यासाठी विशेष कृती दलाची स्थापन करण्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. गडचिरोली जिल्ह्यात नायब तहसीलदारावर झालेल्या हल्ल्यासंदर्भातल्या प्रश्नावर ते उत्तर देत होते. राज्यात गेल्या पाच वर्षांत दस्त नोंदवण्यासाठी मुद्रांकशुल्क निश्चिती करण्यात आलेल्या सर्व प्रकरणांची तपासणी महालेखापरीक्षकांमार्फत करण्याची घोषणाही महसूल मंत्र्यांनी केली. दस्त नोंदणी करण्यासाठी मुद्रांक शुल्क निश्चित करण्याचे अधिकार असणाऱ्यांनी मुद्रांक शुल्क निश्चित करताना संबंधित कायद्याचं उल्लंघन करून ते मनमानी पद्धतीने कमी जास्त केल्याच्या तक्रारी आहेत यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे असं बावनकुळे म्हणाले.

**पुण्यात** लोहगड किल्ल्यावर झालेल्या तरुणाच्या हत्येप्रकरणी SIT नेमण्याचे आदेश विधानसभा तालिका अध्यक्ष राजीव खरे यांनी राज्य सरकारला दिले आहेत. मावळचे आमदार सुनील शेळके यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता.

**२०२३-२४** मधे राज्यभरात जंगलाला आग लागल्याच्या ५ हजार शंभर घटना घडल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी आज सभागृहात दिली. यात ११ हजार ५८० हेक्टर वनजमिनीवर नुकसान झालं असं त्यांनी सांगितलं. यातल्या ७ हजार ४२ घटना एकट्या गडचिरोली जिल्ह्यातल्या आहेत.

<><><><><>

मुंबई उपनगरी रेल्वेत दोन दिवसांपूर्वी झालेल्या एका प्रवाशाच्या हत्येचा मुद्दा विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आज विधानसभेत उपस्थित केला. या मुद्द्यावर सरकारने २९ जूनला सभागृहात निवेदन द्यावं असे निर्देश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले आहेत. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. हे प्रकरण अतिशय गंभीर असून सामान्य नागरिकाच्या सुरक्षेचा प्रश्न यामुळे निर्माण झाला आहे, असं पटोले म्हणाले. उपनगरी रेल्वेमधून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेविषयी सभागृहात चर्चेची मागणी त्यांनी केली. या प्रकरणाचा तपास तातडीने करावा आणि काय कारवाई केली याबाबत

सभागृहात सरकारने निवेदन द्यावं असं ते म्हणाले. यावर अध्यक्ष नार्वेकरांनी सरकारला याबाबत २९ जूनला सभागृहात निवेदन देण्याचे निर्देश दिले आहेत.

मयंक लोहार या तरुणाची दोन दिवसापूर्वी अंधेरी ते बोरीवली प्रवासादरम्यान सचिन सुवर्णा याने चाकू भोसकून हत्या केली.

<><><><><>

मालवाहतूक करणाऱ्या वाहनांमधून प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांचे परवाने रद्द करायचा निर्णय राज्य सरकारनं घेतला असून अधिकाऱ्यांना तशा सूचना दिल्या आहेत, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत केली. १८ मे रोजी डहाणू इथं मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या अपघातात १३ जणांचा झालेला मृत्यू आणि त्याआधी कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर झालेल्या अपघातात ११ जण मृत्युमुखी पडणं याबाबतची लक्षवेधी सूचना सुनील शिंदे यांनी उपस्थित केली होती.

या मार्गावर दर तासाला बस सोडायचे निर्देश दिले असून लवकरच ही वारंवारिता दर अर्ध्या तासात एक बस अशी होईल, असं सरनाईक यांनी सांगितलं.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये हडपसर, दापोडी आणि फुगेवाडी भागात मिथेनॉलमिश्रित दारू पिऊन २२ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी आरोपींवर शक्य असेल तर संघटित गुन्हेगारीसाठीचा मकोका लावू आणि कडक कारवाई करू, असं आश्वासन गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधानपरिषदेत दिलं.

<><><><><>

नागपूर इथला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ मध्य भारतातला प्रमुख विमानतळ म्हणून उदयास येईल तसंच या विमानतळामुळे कृषी निर्यात सक्षम होईल, उद्योग क्षेत्रांना चालना मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नागपूर इथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, जी एम आर या कंपनीकडे हस्तांतरित करण्याचा कार्यक्रम झाला, त्यावेळी ते बोलत होते. या आधुनिक विमानतळाच्या माध्यमातून कार्गो प्रकल्प देखील साकार होईल असं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. विदर्भात साडे सात लाख कोटी रुपयांची व्यावसायिक गुंतवणूक होत असून त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या तर विदर्भाचा विकास वेगानं होईल, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी केलं. तर भारतात विमानतळ परिसरात शहर वसवण्याची संकल्पना

सर्वप्रथम नागपूर शहरात विकसित होईल, असं केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू म्हणाले.

<><><><><>

नसरापूर मधे अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करुन तिची हत्या केल्याबद्दल आरोपी भीमराव कांबळे याला विशेष न्यायालयाने दोषी ठरवलं आहे. आरोपीच्या शिक्षेबाबतचा निवाडा न्यायालय येत्या सोमवारी देणार आहे. आरोपीवर दाखल सर्व गुन्हे सिद्ध झाल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे. गेल्या १ मे रोजी घडलेल्या या गुन्ह्याचा तपास पूर्ण होऊन ५५ दिवसात खटल्याचा निकाल लागला आहे.

<><><><><>

डिजिटल अटक या सायबर गुन्हे प्रकाराच्या २०० हून अधिक प्रकरणात तपास करताना सीबीआय अर्थात केंद्रीय गुप्तचर संस्थेनं महाराष्ट्र, गुजरात, पंजाब आणि दिल्लीसह १६ राज्यांमधल्या ८०पेक्षा जास्त ठिकाणांवर छापे टाकले. तसंच, चेन्नई आणि कोलकाता इथून दोन जणांना अटक केली आहे. देशभरात २०० पेक्षा जास्त डिजिटल अटक प्रकरणांमध्ये सहभाग असलेल्या गुन्हेगारी जाळ्याविरुद्ध ऑपरेशन चक्र ६ अंतर्गत सीबीआय तपास करत आहे.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून अलिकडेच शिवसेनेत सामील झालेले खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांबरोबर अर्वाच्य भाषा वापरल्याप्रकरणी खासदार संजय राऊत यांनी पोलिसात लेखी तक्रार दाखल केली आहे. संजय दिना पाटील यांच्या संवादाच्या निषेधात आज पत्रकारांनी वेगवेगळ्या पद्धतीने निषेध नोंदवला.

<><><><><>

अतिगरजू कुटुंबांना मोफत धान्यपुरवठा करणाऱ्या अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत प्रत्येक कुटुंबाला ३५ किलो धान्य दिलं जात होतं, त्याऐवजी त्याचं वाटप दरडोई ७ किलोप्रमाणे करण्याचा शासनाचा विचार आहे. अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३ मध्ये तशी दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. तसंच अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालयाने १३ जुलै पर्यंत राष्ट्रीय अन्न सुरक्षा दुरुस्ती कायदा २०२६ बद्दल नागरिकांच्या सूचना मागवल्या आहेत.

या दुरुस्तीनुसार अंत्योदय योजनेतल्या कुटुंबांना दरडोई ७ किलोप्रमाणे जास्तीत जास्त ३५ किलो धान्य दिलं जाईल आणि त्याहून चांगली आर्थिक परिस्थिती असलेल्या कुटुंबांना दरडोई ५ किलो धान्य वाटप केलं जाणार आहे. या दुरुस्तीमुळे अधिकाधिक गरजूंना या योजनेचा लाभ मिळेल असं मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यातल्या अनेक जिल्ह्यात पावसानं आजही हजेरी लावली.

**जालना** शहरासह जिल्ह्यात आज सकाळपासून ढगाळ वातावरण आहे. जिल्ह्यातल्या बहुतांश भागात पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी कोसळत आहेत. या पावसामुळे कपाशी लागवडीसह खरिपातल्या रखडलेल्या पेरण्यांना वेग आला आहे.

**बुलढाणा** जिल्ह्यात आज दुपारच्या सुमारास खामगाव तालुक्यातल्या काळेगाव, कंचनपुर, बोरी अडगाव परिसरात जोरदार पाऊस झाला. मांडणी, बोथा कोळी आणि ज्ञानगंगा प्रकल्प परिसरातही तुफान पाऊस झाला. त्यामुळे पेरण्यांना वेग येईल अशी अपेक्षा आहे.

**रत्नागिरीत** पावसाचा जोर आजही कायम आहे. आज सकाळपासून जिल्ह्यात पुन्हा संततधार सुरू झाली. आज सकाळी संपलेल्या २४ तासांत रत्नागिरी तालुक्यात ४३ मिलिमीटर तर राजापूर तालुक्यात ४२ मिलिमीटर पाऊस पडला.

**जळगाव** शहरासह संपूर्ण जिल्ह्यात मध्यरात्रीपासून संततधार पाऊस सुरू असून रावेर तालुका आणि सातपुडा पर्वतरांगांत अतिवृष्टी झाल्याचं वृत्त आहे. पहिल्याच पावसानं नदी-नाले दुथडी भरून वाहू लागल्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे.

**मराठवाड्यात** उद्या आणि परवा दमदार पाऊस होईल तर कोकणात ३० जूनपर्यंत पावसचा जोर राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.**रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सोलापूर, लातूर, धाराशिव** या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे

<><><><><>

येत्या २४ तासात कोकणात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची तर विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//